राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८ परीक्षा दि. १८ ऑगस्ट, २०१८

A ← संच क्रमांक

2018

R11

प्रश्नपुस्तिका क्रमांक
BOOKLET NO.
102717

प्रश्नपुस्तिका-2
मराठी व इंग्रजी

वेळ : 1 (एक) तास

एकूण प्रश्न : 100
एकूण गुण : 100

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 100 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉल्पेनने** लिहावा.

परीक्षा-क्रमांक [ | | | | | | | | ]
केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

www.reliableacademy.com 09922333999

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

1. खालीलपैकी अरबी शब्दांचा गट ओळखा.
   (a) कामगार, मालक (b) शाहीर, साहेब (c) अर्ज, किल्ली (d) हुकूम, तपास

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (a) व (d) बरोबर (2) फक्त (b) बरोबर
   (3) फक्त (c) बरोबर (4) फक्त (c) व (d) बरोबर

---

2. जेव्हा दोन वर्णांची संधी होऊन पहिला वर्ण व्यंजन असल्यास त्या संधीस __________ म्हणतात.
   (a) स्वर संधी (b) व्यंजन संधी (c) हल संधी (d) अच संधी

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (b) आणि (c) बरोबर
   (3) फक्त (d) बरोबर (4) फक्त (b) बरोबर

---

3. ''त्याच्या जिभेला हाड नाही'' या वाक्यातील शब्दशक्ती ओळखा.
   (a) अभिधा (b) व्यंजना (c) लक्षणा (d) ध्वन्यर्थ

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (a) आणि (d) बरोबर (2) फक्त (a) आणि (c) बरोबर
   (3) फक्त (b) बरोबर (4) फक्त (c) बरोबर

---

4. 'भोजनभाऊ' या सामासिक शब्दाचा विग्रह कोणता ?
   (1) भोजनासाठी भाऊ (2) भोजनपंक्तीतील भाऊ
   (3) सख्खा भाऊ (4) भोजनापुरता भाऊ

---

5. पुढील विधाने वाचून योग्य उत्तर लिहा.
   (a) क्रियापदे वाक्यातील क्रिया दाखवितात. (b) धातू म्हणजे क्रियावाचक मूळ शब्द.
   (c) धातू ही विकारी शब्दजाती आहे.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (b) आणि (c) चूक (2) फक्त (b) बरोबर
   (3) फक्त (a) आणि (c) बरोबर (4) सर्व विधाने बरोबर

---

6. पुढील विधाने वाचा.
   (a) आहार, परिहार या शब्दात आ, परि हे उपसर्ग आहेत.
   (b) उपसर्ग हे स्वतंत्रपणे येऊ शकतात.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) (a) व (b) बरोबर (2) फक्त (a) बरोबर
   (3) फक्त (b) बरोबर (4) (a) व (b) दोन्ही चूक

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222339999

7. खालील योग्य वाक्य ओळखा.
   (a) नाम हा अविकारी शब्द आहे.
   (b) एकाच जातीच्या वस्तूंना सामान्यपणे जे नाव दिले जाते त्यास विशेष नाम असे म्हणतात.
   (c) जेव्हा एखाद्या वस्तूला विशेष नाव दिले जाते तेव्हा त्यास सामान्य नाम असे म्हणतात.
   (d) गुण, दोष, धर्म इत्यादींचा बोध होतो, त्यास भाववाचक नाम असे म्हणतात.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (a) बरोबर
   (2) फक्त (b) व (c) बरोबर
   (3) फक्त (d) बरोबर
   (4) फक्त (b) व (d) बरोबर

8. धातुसाधित क्रियाविशेषणाचा अचूक शब्दगट ओळखा.
   (a) दिवसा, वस्तुत:, अर्थात
   (b) हसू, हसता, हसताना
   (c) कोठून, खालून, येथपर्यंत
   (d) त्यामुळे, ह्यावरून, कित्येकदा

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) फक्त (a) बरोबर
   (2) फक्त (a) व (b) बरोबर
   (3) फक्त (b) बरोबर
   (4) फक्त (c) व (d) बरोबर

9. पुढील विधाने वाचा.
   (a) वाक्य म्हणजे पूर्ण अर्थाचे बोलणे होय.
   (b) वाक्यातील शब्दांना पद असे म्हणतात.
   (c) वाक्य म्हणजे शब्दांची मांडणी होय.

   **पर्यायी उत्तरे :**
   (1) (a) व (b) बरोबर, (c) चूक
   (2) फक्त (a) बरोबर, (b) व (c) चूक
   (3) (a), (b) व (c) बरोबर
   (4) (b) व (c) बरोबर व (a) चूक

10. व्यंजन संधीची उदाहरणे असलेला गट ओळखा.
    (a) पृथक् + करण = पृथक्करण
    (b) रज: + गुण = रजोगुण
    (c) मन: + रम = मनोरम
    (d) मृत् + शकट = मृच्छकट

    **पर्यायी उत्तरे :**
    (1) फक्त (a) व (b) बरोबर
    (2) फक्त (b) व (c) बरोबर
    (3) फक्त (a) व (d) बरोबर
    (4) फक्त (b) व (d) बरोबर

11. पुढीलपैकी परभाषी शब्द कोणते ते ओळखा ?
    (1) दगड, घोडा, हाड
    (2) हापूस, कामगार, जाहीर
    (3) पोट, रेडा, झोप
    (4) गुडघा, बाजरी, कंबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

**12.** 'कधीही न दिसणारी कुसूम, दुर्मिळ वस्तूप्रमाणे वारंवार दृष्टीस पडत नाही.'
या स्पष्टीकरणासाठी योग्य वाक्प्रचार निवडा.

(a) उंबराचे फूल (b) गुलाबाचे फूल
(c) गट्टी फू करणे (d) कपिला षष्टीचा योग

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (c) व (d) बरोबर
(3) फक्त (a) व (d) बरोबर (4) फक्त (a) बरोबर

---

**13.** समानार्थी शब्दांच्या जोड्या जुळवा.

(a) समुद्र (i) अंबुज
(b) कमळ (ii) शार्दूल
(c) चंद्र (iii) जलधी
(d) सिंह (iv) सोम

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (3) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (4) | (ii) | (i) | (iii) | (iv) |

---

**14.** शब्द व त्या शब्दाचे लिंग यांच्या जोड्या ओळखा व अचूक गट निवडा.

(a) दगड – नपुंसकलिंग (b) कोनाडा – पुल्लिंग (c) मांजर – स्त्रीलिंग (d) माती – स्त्रीलिंग

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (c) व (d) बरोबर
(3) फक्त (b) व (d) बरोबर (4) फक्त (a) व (c) बरोबर

---

**15.** अधोरेखित शब्द समूहाचे योग्य उत्तर कोणते ?
'<u>या सत्कार्याबद्दल</u> येथे जमलेले सर्व गावकरी आपले अभिनंदन करत आहेत.'

(1) उद्देश्य विस्तार (2) उद्देश्य (3) विधेय विस्तार (4) विधेय

---

**16.** 'तुम्ही आम्हाला वगळले.' या वाक्यातील कर्ता व कर्म ओळखा.

(a) वगळले – कर्म, तुम्ही – कर्ता (b) तुम्ही – कर्ता, आम्हाला – कर्म
(c) आम्हाला – कर्ता, तुम्ही – कर्म (d) वगळले – कर्म, आम्हाला – कर्ता

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (a) बरोबर
(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) फक्त (b) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222333999

17. 'वादळ असे भरून आले तारू भरकटणार होते
लाटा अशा घेरत होत्या काही सावरणार नव्हते'
वरील काव्यपंक्तीतील शब्दशक्ती ओळखा.
(1) व्यंजना (2) लक्षणा (3) अभिधा (4) योगरूढ

---

18. विरामचिन्हांचा अचूक वापर असलेली वाक्य ओळखा.
(a) पुन्हा तो काळी पँटवाला माझ्या अंगावर आला, त्यावेळी मी भडकलोच
(b) अरे कोण धक्का मारतो ? तो साळसुदपणाचा आव आणू लागला.
(c) मी त्याला बजावले,'तुम्ही मध्ये बोलू नका!'
(d) मी निरुत्तर झालो, हा दुसरा काळी पँटवाला हसला.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (a) व (c) बरोबर
(3) फक्त (c) व (d) बरोबर (4) फक्त (b) व (c) बरोबर

---

19. पुढील विधाने वाचा व योग्य पर्याय निवडा.
(a) त्, थ्, द्, ध् हे दंत्य वर्ण आहेत. (b) प्, फ्, ब्, भ् हे ओष्ठ्य वर्ण आहेत.
(c) य्, र्, ल्, व् हे अर्धस्वर आहेत.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (a) आणि (c) बरोबर (2) फक्त (a) आणि (b) बरोबर
(3) फक्त (b) आणि (c) बरोबर (4) (a), (b), (c) हे तिन्ही ही विधाने बरोबर

---

20. सजातीय जोड्यांपैकी दोन स्वर एकमेकांसमोर येऊन होणाऱ्या संधीस ________ म्हणतात.
(1) पूर्वरूप संधी (2) दीर्घत्व संधी (3) व्यंजन संधी (4) अनुनासिक संधी

---

21. 'सुरेशने गाणे सुरेल म्हटले.' या वाक्यातील कर्मविस्तार :
(1) सुरेल (2) गाणे सुरेल (3) सुरेल गाणे (4) म्हटले

---

22. 'एके दिवशी युद्ध बंद झाल्याची बातमी येऊन थडकली.' या वाक्यातील विधेय विस्तार कोणते ते सांगा?
(1) युद्ध बंद झाल्याची (2) बातमी (3) येऊन, एके दिवशी (4) थडकली

---

23. 'उथळ पाण्याला खळखळाट फार' या वाक्याचा योग्य पर्याय निवडा.
(a) मोठ्या माणसाच्या ठिकाणी दोष हे असतातच.
(b) ज्यांच्या अंगी गुण थोडा तो फार बढाई मारतो.
(c) वाजवीपेक्षा जास्त शहाणपणा दाखवू नये.
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त (b) आणि (c) बरोबर (2) फक्त (a) बरोबर
(3) फक्त (a) आणि (b) बरोबर (4) फक्त (b) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

**24.** योग्य जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | गणनावाचक संख्याविशेषण | (i) | एकेक मुलगा |
| (b) | क्रमवाचक विशेषण | (ii) | चौपट मुले |
| (c) | आवृत्तिवाचक विशेषण | (iii) | दहा मुली |
| (d) | पृथकत्ववाचक विशेषण | (iv) | पहिला वर्ग |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iv) | (ii) | (iii) | (i) |
| (4) | (iv) | (iii) | (i) | (ii) |

---

**25.** 'वारा' या शब्दाला समानार्थी शब्द निवडा.

(a) मरूत (b) समर (c) अनल (d) समीरण

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (a) बरोबर
(3) फक्त (a) व (d) बरोबर
(4) फक्त (c) व (d) बरोबर

---

**26.** योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | उपसर्गघटित शब्द | (i) | पुजारी |
| (b) | शब्दसाधिते | (ii) | अभिनंदन |
| (c) | अभ्यस्त शब्द | (iii) | वारकरी |
| (d) | प्रत्ययघटित शब्द | (iv) | शेजारीपाजारी |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (2) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (3) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (4) | (ii) | (iii) | (iv) | (i) |

---

**27.** पुढील विधानं वाचून योग्य उत्तर लिहा.

(a) शब्दयोगी अव्यय हे नाम व सर्वनामांना लागतात.

(b) शब्दयोगी अव्ययामुळे नामाचे किंवा सर्वनामाचे सामान्यरूप होत नाही.

(c) शब्दयोगी अव्ययांच्या ठिकाणी क्रियाविशेषण आणि विभक्ती प्रत्ययाचे गुण असतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (b) बरोबर
(2) फक्त (a) आणि (b) बरोबर
(3) फक्त (a) आणि (c) बरोबर
(4) (a), (b) आणि (c) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222333999

28. प्रधानत्वसूचक उभयान्वयी अव्ययाचे प्रकार ओळखा.

(a) विकल्पबोधक (b) उद्देशदर्शक (c) परिणामबोधक (d) संकेतदर्शक

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (a) व (c) बरोबर

(3) फक्त (b) व (c) बरोबर (4) फक्त (b) व (d) बरोबर

---

29. 'विजा चमकू लागल्या आणि पावसाला सुरुवात झाली.' या वाक्यातील आणि या अव्ययास काय म्हणतात?

(1) विकल्पबोधक उभयान्वयी अव्यये (2) समुच्चय बोधक उभयान्वयी अव्यये

(3) परिणामबोधक उभयान्वयी अव्यये (4) उद्देशबोधक उभयान्वयी अव्यये

---

30. 'न्यायाधीशाकडून दंड आकारण्यात आला.' या वाक्याचा प्रयोग ओळखा.

(1) शक्यकर्मणी (2) पुरुषकर्मणी (3) कर्मकर्तरी (4) भावकर्तरी

---

31. जोड्या जुळवा.

(a) सिद्ध शब्द (i) लाललाल, घरघर, गटागटा

(b) साधित शब्द (ii) राजपुत्र, देवालय, मतिमंद

(c) सामासिक शब्द (iii) लेखक, नयन, वदन, वंदनीय

(d) अभ्यस्त शब्द (iv) जा, ये, कर, खा, पी, घे

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (2) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iii) | (ii) | (i) | (iv) |

---

32. पुढील विधाने वाचा.

(a) केवल वाक्यात एकच उद्देश्य व एकच विधेय असते.

(b) केवल वाक्यास शुद्धवाक्य असेही म्हणतात.

(c) जे चकाकते, ते.सोने नसते. हे केवलवाक्य आहे.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर, (b) चूक (2) (b) व (c) बरोबर, (a) चूक

(3) (a) व (b) बरोबर, (c) चूक (4) (a), (b) व (c) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

33. जोड्या जुळवा.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | आपण अचानक कसे आलात? | (i) | आदरार्थी सर्वनाम |
| (b) | आपण आमचे पाहुणे आहात. | (ii) | दर्शक सर्वनाम |
| (c) | जो प्रश्न तू म्हणालास तो कठीण नव्हता. | (iii) | संबंधी सर्वनाम |
| (d) | हा मुलगा कोठे हरवला? | (iv) | द्वितीय पुरुषवाचक सर्वनाम |

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (i) | (iv) | (ii) | (iii) |
| (4) | (iv) | (i) | (iii) | (ii) |

34. अचूक जोड्या ओळखा.

(a) सचिन क्रिकेट खेळतो – अकर्मक क्रियापद

(b) छान नाच केला मंजूने – सकर्मक क्रियापद

(c) सुरेश उद्या पुण्याला जाईल – अकर्मक क्रियापद

(d) काल रात्री सारखे गडगडत होते – अकर्तृक क्रियापद

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर, (b) व (d) चूक

(2) फक्त (b), (c) व (d) बरोबर, (a) चूक

(3) फक्त (b) व (d) बरोबर, (a) व (c) चूक

(4) फक्त (a), (b) व (d) बरोबर, (c) चूक

35. अचूक जोडी कोणती?

(a) गुणवाचक विशेषण – कडक ऊन पडले आहे.

(b) संख्यावाचक विशेषण – ठाण्यात दहा शिपाई होते.

(c) सार्वनामिक विशेषण – ते पेन मला आवडले.

(d) धातुसाधित विशेषण – सुंदर फुलांनी बाग बहरली होती.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a), (b) व (c) बरोबर, (d) चूक

(2) फक्त (c) व (d) बरोबर, (a) व (b) चूक

(3) फक्त (a) बरोबर, (b), (c) व (d) चूक

(4) (a), (b), (c) व (d) बरोबर

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222333999

**36.** पुढीलपैकी व्यंजन संधीचे उदाहरण कोणते ?

(a) चिदानंद (b) तपोधन (c) दुरात्मा

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) बरोबर (2) फक्त (b) बरोबर

(3) फक्त (c) बरोबर (4) (b) आणि (c) बरोबर

---

**37.** 'पोबारा करणे', या वाक्प्रचाराचा अर्थ व्यक्त करणारा वाक्प्रचार कोणता ?

(1) वर्ज्य करणे (2) वाखाणणी करणे (3) सूंबाल्या करणे (4) पायमल्ली करणे

---

**38.** 'कालिदास कवी होता.' या वाक्यातील विधेयपूरक कोणते ?

(1) कालिदास (2) कवी (3) होता (4) कवी होता

---

**39.** 'सहोदर' या शब्दासाठी खालील शब्दसमूह कोणते ? पर्याय निवडा.

(a) कवीला व वाचकाला आलेला एकसारखा अनुभव.

(b) दोन पदार्थाचे गुणधर्म एकसारखे असणे.

(c) एकाच आईच्या पोटी जन्मलेले.

(d) एकाच साच्यात बनलेले.

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (b) बरोबर (2) फक्त (c) व (d) बरोबर

(3) फक्त (c) बरोबर (4) फक्त (a) व (c) बरोबर

---

**40.** योग्य जोड्या लावा.

(a) निशा (i) कपी

(b) मर्कट (ii) कांचन

(c) इंदिरा (iii) यामिनी

(d) हेम (iv) वैष्णवी

**पर्यायी उत्तरे :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (2) | (iii) | (i) | (iv) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (4) | (iv) | (i) | (ii) | (iii) |

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

41. 'जें साहित्यानें वोजावी। अमृतानें चुकी ठेवी।'
या ओवीतील 'चुकी ठेवणे' या शब्दांचा अर्थ असलेला पर्याय निवडा.

(a) दोष लावणे
(b) नावे ठेवणे
(c) वरचढपणा कमी करून कमीपणा आणणे
(d) कनिष्ठपणा देणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (c) व (b) बरोबर
(3) फक्त (a), (b) व (c) बरोबर
(4) (a), (b), (c) व (d) बरोबर

---

42. शब्द आणि समास यांच्या योग्य जोड्या जुळवा.

(a) भीमार्जुन (i) समाहार द्वंद्व
(b) मीठभाकर (ii) इतरेतर द्वंद्व
(c) पापपुण्य (iii) बहुव्रीही
(d) नीळकंठ (iv) वैकल्पिक द्वंद्व

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (2) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (3) | (ii) | (i) | (iv) | (iii) |
| (4) | (ii) | (iv) | (i) | (iii) |

---

43. 'खेड्यातील माणसे आता बरीच पुढारली' या वाक्यातील 'पुढारली' या क्रियापदास काय म्हणतात ?

(1) अनियमित क्रियापद
(2) शक्य क्रियापद
(3) साधित क्रियापद
(4) प्रयोजक क्रियापद

---

44. शब्दसमूहाला योग्य शब्द असलेले पर्याय ओळखा.

(a) देवापुढे सतत तेवत राहणारा दिवा – लामण दिवा
(b) नाटकाच्या प्रारंभीचे स्तवन – नांदी
(c) तमाशाच्या प्रारंभीचे स्तवन – गवळण
(d) शेजाऱ्यांशी चांगल्या प्रकारे वागण्याची रीत – शेजारकर्म

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (a) व (c) बरोबर
(2) फक्त (a) व (b) बरोबर
(3) फक्त (b) बरोबर
(4) फक्त (c) व (d) बरोबर

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222333999

45. मराठी उपसर्ग लागून तयार न झालेला शब्द कोणता ?

(1) अजाण (2) अबोल (3) दररोज (4) आडनाव

**पुढील उतारा वाचून प्र.क्र. 46 ते 50 ची उत्तरे लिहा -**

भाषेचा अभ्यास म्हणजे तिच्या लिखित रूपाचा अभ्यास ही समजूत अलीकडेपर्यंत रूढ होती. प्रगत भाषांना बोली आणि लिखित अशी दोन्ही रूपे असतात, हे खरे असले तरी, सर्वच भाषांना लिपी असते असे नाही. जगातील भाषांचा अभ्यास केल्यानंतर असे लक्षात आले आहे की बऱ्याचशा भाषांना लिपी नाही, तरी संप्रेषणाचे कार्य त्या करू शकतात. आपल्याकडल्या अशिक्षित माणसाला लिहिता-वाचता आले नाही तरी तो भाषा वापरतच असतो. याचा अर्थ हा की **'बोलणे'** हे भाषेचे मुख्य रूप आहे. 'लिहिणे' हे भाषेचे दुय्यम आणि नंतर निर्माण केले गेलेले रूप आहे. लेखन ही ज्ञान टिकवण्याची सोय आहे. लिपीवरून भाषेच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येतोच असे नाही. लिखित रूपाच्या पलीकडे भाषेचे कितीतरी वेगवेगळे वापर असतात. भाषाविज्ञानाला या साऱ्यांचा विचार करायचा असतो. म्हणून आधुनिक भाषाविज्ञान भाषेच्या बोली (औच्चारिक) रूपाचा अभ्यास करण्यावर भर देते. त्यामुळेच टेपरेकॉर्डरसारखी साधने वापरून भाषेचे औच्चारिक नमुने गोळा करणे आणि त्यांचा अभ्यास करणे ही पद्धत शास्त्रशुद्ध मानली जाते.

भाषेचा अभ्यास म्हणजे साहित्याचा अभ्यास ही अशीच एक गैरसमजूत आहे. साहित्याखेरीज इतर अनेक क्षेत्रांत भाषेचा वापर होत असतो. साहित्य हे भाषेच्या अनेक रूपांपैकी एक रूप आहे. कुटुंबातील माणसांशी किंवा मित्र-मैत्रिणींशी बोलताना भाषेचे अगदी अनौपचारिक रूप आपण वापरत असतो. सभेत भाषण देताना किंवा वर्गात शिकवताना भाषेची वेगवेगळी पण औपचारिक रूपे वापरली जातात. व्यापार उद्योगांसारख्या क्षेत्रांत भाषेचे व्यावहारिक रूप आपल्याला बघायला मिळते. शासकीय व्यवहार, कोर्टकचेऱ्या, जाहिरात-विभाग इत्यादी ठिकाणी भाषेचा वापर कसा करायचा याची विशिष्ट तंत्रे ठरलेली असतात. साहित्यापलीकडे भाषेची अशी जी वेगवेगळी क्षेत्रे असतात त्यांचा अभ्यास भाषाविज्ञानाच्या कक्षेत येतो. भाषेचे समग्र स्वरूप समजावून घेण्यासाठी वेगवेगळ्या संदर्भांत केला जाणारा भाषेचा वापर अभ्यासणे आवश्यक असते. व्यक्ती-व्यक्तिगणिक भाषा बदलत असते. जात, व्यवसाय यांनुसारही भाषेची रूपे बदलताना दिसतात. यातून एकाच भाषेत भाषाभेद निर्माण होत राहतात. भाषेचा अभ्यास करताना भाषाभेदांचा विचार करावा लागतो.

आर्थिक, राजकीय किंवा धार्मिक सत्ता हाती असलेला प्रतिष्ठितांचा वर्ग समाजावर नेहमी वर्चस्व गाजवून असतो. प्रतिष्ठितांची किंवा वर्चस्व गाजवणाऱ्या वर्गाची भाषा हीच खरी शुद्ध भाषा आणि समाजातील अन्य वर्गांची भाषा म्हणजे अशुद्ध, असंस्कृत आणि अप्रगत भाषा, हा भाषेबद्दलचा गैरसमजच आहे. उदाहरण घ्यायचे झाले तर पुण्याच्या ब्राह्मण वर्गाची भाषा शुद्ध आणि कुणबी किंवा कोळी यांची भाषा अशुद्ध ही कल्पना चुकीची आहे. प्रतिष्ठित वर्गाच्या भाषेचाच आजवर अभ्यास झाल्यामुळे ही गैरसमजूत अधिक बळावली आहे. पण कोळी, कुणबी अशा जातीय बोलींचा किंवा खानदेशी, वऱ्हाडी अशा प्रादेशिक बोलींचा अभ्यास केला तर असे लक्षात येते की पुणेरी मराठीप्रमाणेच या बोलींनाही स्वत:ची अशी नियमव्यवस्था आहे. 'नियमबद्ध संकेतीकरणावर आधारलेल्या संप्रेषण प्रणाली' असेच त्यांचे रूप आहे. मराठीचा अभ्यास करताना मराठीच्या प्रादेशिक बोलींचा आणि जातिपरत्वे पडणाऱ्या भेदांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9822…999

**46.** भाषेच्या अभ्यासाविषयी कोणकोणत्या गैरसमजुती आहेत ?

(a) प्रतिष्ठितांची भाषा म्हणजे शुद्ध (b) समाजातील अन्य वर्गाची भाषा अशुद्ध

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) बरोबर, (b) चूक (2) (a) व (b) बरोबर

(3) फक्त (a) बरोबर (4) फक्त (b) बरोबर

---

**47.** योग्य शीर्षक निवडा.

(1) लिखित रूपाचा अभ्यास (2) बोलीचा अभ्यास

(3) साहित्याचा अभ्यास (4) भाषेचा अभ्यास

---

**48.** मराठीचा अभ्यास करताना कोणकोणत्या गोष्टींचा अभ्यास करणे आवश्यक असते ?

(a) मराठीच्या प्रादेशिक बोलींचा (b) जातिपरत्वे पडणाऱ्या भेदांचा

(c) प्रतिष्ठित वर्गाच्या भाषेचा

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a) व (c) बरोबर (2) (b) व (c) बरोबर

(3) (a) व (b) बरोबर (4) (a), (b) व (c) चूक

---

**49.** योग्य पर्याय निवडा.

(a) भाषांना लिपी नसली तरी संप्रेषणाचे कार्य त्या करतात.

(b) अशिक्षित माणसेही भाषा वापरतात.

(c) व्यक्ती-व्यक्तिगणिक भाषा बदलते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) (a), (b), (c) बरोबर (2) (a) व (c) बरोबर

(3) (a) व (b) बरोबर (4) (b) व (c) बरोबर

---

**50.** लेखनामुळे कोणता फायदा होतो ?

(1) भाषेचा अभ्यास करता येतो. (2) ज्ञान टिकवता येते.

(3) भाषेच्या नेमक्या स्वरूपाचा अंदाज येतो. (4) बोली रूपाचा अभ्यास करता येतो.

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 02223333999

51. Choose the **correct** sentences :
(a) If it rains, we'll cancel the match.
(b) If it rained, we'd cancel the match.
(c) If it will rain, we'll cancel the match.
**Answer options :**
(1) (a) and (c) only (2) (a) and (b) only (3) (c) only (4) (a), (b) and (c)

52. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Cut a figure | (i) | To have little or no effect |
| (b) | Cut no ice | (ii) | To interrupt someone |
| (c) | Cut across | (iii) | To take a shorter way |
| (d) | Cut in | (iv) | To produce effect |

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (2) | (i) | (iv) | (iii) | (ii) |
| (3) | (i) | (iii) | (iv) | (ii) |
| (4) | (ii) | (iii) | (i) | (iv) |

53. Find out the **incorrect** sentence/s :
(a) He was as white as a sheet.
(b) It was more expensive than I thought.
(c) This is the most oldest theatre in London.
(d) She is one of the kindest woman.
**Answer options :**
(1) (c) and (d) (2) (b) only (3) (b) and (c) (4) (a) and (d)

54. The report that he has failed has surprised us all.
Replace the underlined clause by a phrase :
(a) The report of failure has surprised us all.
(b) The report of his failure has surprised us all.
(c) His failed report has surprised us all.
(d) The report that he failed has surprised us all.
**Answer options :**
(1) (a) and (b) (2) (a) (3) (b) (4) (c) and (d)

55. Choose the **correct** indirect narration of the following sentence.
Hari said to him, "I shall not come to you tomorrow".
(1) Hari told him that he would not come to him the next day.
(2) Hari told him that he would not come to him tomorrow.
(3) Hari told him that he would not go to him the next day.
(4) Hari said to him that I should not go to you tomorrow.



www.reliableacademy.com 9222333999

**56.** He could not put by anything for the rainy days.

Select the most appropriate meaning of the underlined phrase in the above sentence.

(1) save (2) collect (3) read (4) kill

**57.** Give antonym of the following words.
Lament, Scatter

(1) rejoice, gather (2) sad, collect (3) mourn, store (4) chaste, gay

**58.** Identify adjective clause in the following sentences :

(1) Jeffrey is the bad boy who stole the apples.
(2) The whole country was sadden when Oswald assassinated Kennedy.
(3) The teachers all agreed that the boy was innocent.
(4) As soon as he arrives, we will have lunch.

**59.** Match the following underlined words with their parts of speech.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | They are men of like build and stature | (i) | Noun |
| (b) | Like as a father pitieth his own children | (ii) | Verb |
| (c) | Children like sweets | (iii) | Adverb |
| (d) | We shall not see his like again | (iv) | Adjective |
| (e) | Don't talk like that | (v) | Preposition |

**Answer options :**

| | **(a)** | (b) | (c) | **(d)** | **(e)** |
|---|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (iii) | (ii) | (i) | (v) |
| (2) | (iii) | (iv) | (v) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (v) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (ii) | (i) | (iv) | (iii) | (v) |

**60.** Match the following to fill in the blanks :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Good wine needs no _____. | (i) | Eggs |
| (b) | Two _____ are better than one. | (ii) | Bush |
| (c) | The game is not worth the _____. | (iii) | Heads |
| (d) | Do not put all your _____ in one basket. | (iv) | Candle |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (i) | (iv) |
| (2) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (3) | (ii) | (iii) | (iv) | (i) |
| (4) | (iii) | (ii) | (iv) | (i) |

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222333999

61. Identify the **correct** sentence/s :
(a) Robinsons are away this weekend.
(b) Computers are an important research tool.
(c) He shook with the fear.
**Answer options :**
(1) Only (a) (2) Only (b) (3) Only (c) (4) All the above

62. Fill in the blank :
The children ignored all the other food and made a __________ for the cakes.
(1) straight line (2) beeline (3) beehive (4) circle

63. Identify the sentence/s which is/are **incorrect**.
(a) Neither my mother nor my father went to University.
(b) I neither know nor care what's happened to him.
(c) They speak neither Marathi nor Hindi but a curious mixture of both.
(d) I neither insulted him nor his friend.
**Answer options :**
(1) (a), (b) (2) (c), (d) (3) (b), (c) (4) only (d)

64. Which mood is used in the following sentence :
God bless you !
(1) Subjunctive (2) Indicative
(3) Imperative (4) None of the above

65. Identify the meaning of underlined idiom in the following sentence :
He was dressed up like a dog's dinner .
(1) poorly dressed (2) dressed in a traditional way
(3) over-dressed in a showy-way (4) civil dressed

66. Discipline is on the wane in schools and colleges, these days.
Identify the correct meaning of the underlined.
(1) spreading (2) increasing (3) spirraling (4) decreasing

67. Which of the following sentence/s is/are **correct** :
(a) If I had known that you were coming, I have met you at the airport.
(b) If I had known that you were coming, I have meet you at the airport.
(c) If I had known that you were coming, I would have met you at the airport.
(d) If I had known that you were coming, I would have meet you at the airport.
**Answer options :**
(1) (a) (2) (c) (3) (a) and (b) (4) (c) and (a)

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

**68.** Choose the **incorrect** sentences.
(a) Each of the candidates are well qualified.
(b) Neither of those choices were attractive.
(c) My family are punctual and hard-working people.
**Answer options :**
(1) (a) only (2) (a) and (c) only
(3) (a) and (b) only (4) (a), (b) and (c)

**69.** "You should take the job, Frank". Said Lee.
Select the most appropriate indirect narration of the above sentence.
(1) Lee said that Frank should take the job.
(2) Lee suggested that Frank should take the job.
(3) Lee encouraged Frank to take the job.
(4) Lee said to Frank that he should have taken the job.

**70.** Identify the sentence/s having noun clause, in it/them.
(a) The problem is who will bell the cat.
(b) Who stole the diamond is a mystery.
(c) The boy who sang a song is my brother.
**Answer options :**
(1) Only (a) and (c) (2) Only (c)
(3) Only (a) and (b) (4) Only (b) and (c)

**71.** Choose the **correct** sentence :
(a) Leap years that have 366 days contain an extra day in February.
(b) Leap years, which have 366 days, contain an extra day in February.
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) only
(3) Both (a) and (b) (4) None of the above

**72.** Give antonym of the following words :
Convex, famous, Kernel
(1) curved, known, officer (2) concave, obscure, shell
(3) dusk, gloomy, attack (4) stale, reputed, cover

**73.** Change the following simple sentence into compound sentence.
Climbing up the tree, he plucked some mangoes.
(a) He climbed up the tree and plucked some mangoes.
(b) He climbed up the tree to plucked some mangoes.
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) only
(3) Both (a) and (b) (4) None of the above

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.chitraacademy.com 9222333999

74. Identify the **incorrect** meaning of the following word :
Saw
(1) to cut something
(2) a tool that has a long blade with sharp points
(3) to dream something
(4) past tense of see

75. Their shops are a by word for good value. Identify the correct meaning of the underlined word in the given context :
(1) a person or thing that is well-known for a particular quality
(2) important in showing moral values
(3) important shop in the town
(4) famous shop in the town

76. Choose the words having meaning opposite to that of INTREPID :
(a) Pusillanimous (b) Timorous (c) Timid (d) Undaunted
**Answer options :**
(1) (c) only (2) (a) and (c) only
(3) (a), (b) and (c) only (4) (a), (b), (c) and (d)

77. Identify the **correct** sentence/s :
(a) *The Machine Gunners* was one of Robert Westall's most successful books.
(b) Among the people invited was the mayor.
(c) They have been playing since four O'clock.
**Answer options :**
(1) (a), (b) and (c) (2) (b) and (c) (3) Only (c) (4) (a) and (c)

78. India stands for peace.
That should be known to everybody.
Change the above sentences into complex sentence :
(a) India stands for peace should be known to everybody.
(b) It should be known to everybody that India stands for peace.
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) only
(3) Both (a) and (b) (4) None of the above

79. Fill in the blanks :
(a) I'm __________ a film tonight.
(b) I'll be __________ all day on Sunday.
(c) I'm __________ ask him to return my money.
**Answer options :**
(1) will see, slept, going to (2) seeing, slept, going to
(3) seeing, sleeping, going to (4) will see, sleeping, going to

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9922333099

80. Fill in the blanks :
(a) If you _________ hard, you would get a first class.
(b) If you _________ two packets of detergent, you'll get a third packet free.
(c) If you _________ me, I would have lent you some money.
**Answer options :**
(1) study, bought, ask
(2) study, bought, asked
(3) studying, buy, had asked
(4) studied, buy, had asked

81. Give synonym of the following words.
Obstinate, Slander, Thrifty
(1) disease, vilification, headstrong
(2) filthy, smear, sparing
(3) hidden, thin, economical
(4) stubborn, defamation, frugal

82. Change the following sentence into passive voice :
We saw them go out.
(1) They were seen gone out
(2) They have seen to go out
(3) They saw us to go out
(4) They were seen to go out

83. Spot/identify the errors in the following sentence.
I was laying down when the phone bell rang.
(a) Rang (b) Laying (c) When
**Answer options :**
(1) (a) only (2) (b) only (3) (c) only (4) (a), (b) and (c)

84. Identify the correct sentence.
(a) I was sure that I had met him before.
(b) On my last visit to Wixton I found that the village didn't change much.
(c) She admitted that she has stolen the watch.
**Answer options :**
(1) Only (a) (2) Only (a) and (c) (3) Only (b) and (c) (4) Only (c)

85. Match the following :
(a) See eye to eye — (i) Willing to
(b) See one's way — (ii) to become very angry
(c) See red — (iii) to make arrangements for
(d) See about — (iv) to agree completely

**Answer options :**

| | (a) | (b) | (c) | (d) |
|---|---|---|---|---|
| (1) | (ii) | (iv) | (iii) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (i) | (ii) | (iii) |
| (4) | (i) | (iv) | (ii) | (iii) |

www.reliableacademy.com 9222333999

86. Choose the words having similar meanings :
(a) ADIPOSE (b) OLEAGINOUS (c) FATTY
**Answer options :**
(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only
(3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

87. Identify the **correct** sentence/s :
(a) The scissors are blunt.
(b) Statistics was always my worst subject.
(c) The economics behind their policies are unreasonable.
(d) The governing party usually do bad in mid term by-elections.
**Answer options :**
(1) Only (a), (b), (c) (2) Only (b), (c), (d)
(3) Only (a) and (c) (4) All the above

88. Fill in the blanks.
(a) His excuses, ________ were not convincing, angered his sister.
(b) I made the dress I intend ________.
(c) The organisers invited entries ________ did not exceed 1000 words.
**Answer options :**
(1) since, to wear, that (2) which, to wear, that
(3) because, wearing, that (4) which, wearing, that

89. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Fratricide | (i) | Too strong to be defeated |
| (b) | Numismatics | (ii) | Repeating the actual words exactly |
| (c) | Verbatim | (iii) | The study of coins |
| (d) | Invincible | (iv) | The act of murdering one's brother or sister |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (iv) | (iii) | (ii) | (i) |
| (4) | (iii) | (iv) | (i) | (ii) |

90. Identify the **correct** sentence from the following sentences.
(a) Is there enough cake for everyone ?
(b) I have enough had of your excuses.
(c) I don't think he is really experienced enough for this sort of job.
(d) I hope my instructions are clear enough.
**Answer options :**
(1) (a), (b) (2) (b), (c) (3) (a), (c), (d) (4) (a), (b), (d)

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

91. Fill in the blanks in the responses to the given questions :

(a) You haven't met my brother, have you ?

_________ I haven't.

(b) You can swim well, can't you ?

_________ I can't.

(c) There is nothing more to be done, is there ?

_________ there is.

**Answer options :**

(1) Yes, yes, no (2) No, no, yes (3) No, yes, no (4) Yes, no, no

---

92. The eldest son worked on the farm, the second son worked in the blacksmith's shop, _________ the youngest son left home to seek his fortune.

Choose the most appropriate alternative to complete the sentence.

(1) yet (2) and (3) but (4) then

---

93. I feel guilty today because I've not paid you that cheque.

Identify the underlined clause in the above sentence.

(1) Noun clause (2) Adjective clause (3) Adverb clause (4) Main clause

---

94. Choose the correct sentences :

(a) Can you tell me why are you late ?

(b) Do you think does your name indicate your personality ?

(c) Do you think you can mention social work and oceanography together ?

**Answer options :**

(1) (c) only (2) (a) and (c) only (3) (b) and (c) only (4) (a), (b) and (c)

---

95. Change the following sentence into indirect speech :

He said, "The horse died in the night".

(1) He said that the horse died in the night.

(2) He says that the horse died in the night.

(3) He said that the horse was died in the night.

(4) He said that the horse had died in the night.

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK



www.reliableacademy.com 9222333999

**Read the passage given below carefully and answer Question numbers 96 to 100 based on it.**

Dilip Chitre (b. 1938) was educated in Baroda and Mumbai. He has been a teacher, painter, film-maker and magazine columnist. A winner of the Sahitya Akademi Award, Chitre has lived and taught in Ethiopia and the USA and was invited to participate in the Iowa University International Writing Programme. He is a bilingual writer and writes mostly in Marathi. His major translations (from Marathi into English) include ***An Anthology of Marathi Poetry***, (1945-1965) and ***Says Tuka*** (1991). ***Travelling in a Cage*** (1980) is his first and only book of English poems. Exile, alienation, self-disintegration and death are the major themes in Chitre's poetry. It belongs essentially to the Modernist Movement, as it reflects cosmopolitan culture, an urban sensibility, uses oblique expressions and ironic tones.

'Father Returning Home', selected from ***Travelling in a Cage***, is a deftly drawn word portrait of a commuter and his dull, drab and exhausting daily routine. Forced to return to stale food and painful isolation at home, the pathetic old man has no choice but to talk to himself. He is delinked from the present, including his family, and can only communicate with the buried past and unborn future dreaming about his ancestors and grandchildren. Characteristically, the poem is totally devoid of sentimentality despite its tender subject. The evocative imagery, subtle irony and the symbolic projection of the commuter as a modern nomad are the major devices which reinforce the theme of man's estrangement from a man-made world.

---

**96.** Match the following :

| | **(a)** | | (b) |
|---|---|---|---|
| (a) | alienation | (i) | uprooting |
| (b) | drab | (ii) | nomad |
| (c) | commuter | (iii) | estrangement |
| (d) | exile | (iv) | dull |

**Answer options :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iv) | (ii) | (i) | (iii) |
| (2) | (iii) | (iv) | (ii) | (i) |
| (3) | (ii) | (iii) | (i) | (iv) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

---

**97.** Dilip Chitre's poetry deals with _________.

(a) isolation (b) uprooting (c) death (d) nature

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (d) (4) (a), (b) and (c)

---

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

**98.** Dilip Chitre's poetry has following features :

(a) indirect expressions.

(b) expression of experiences of different cultures

(c) man-woman relationship

(d) lack of sensibility

**Answer options :**

(1) (a) and (c) (2) (a) and (d) (3) (a) and (b) (4) (c) and (d)

---

**99.** The poem 'Father Returning Home' is a word picture of ________.

(a) city workers drudgery (b) traveller's dreams

(c) urban man's isolation (d) None of the above

**Answer options :**

(1) (a) and (b) (2) (b) and (c) (3) (a) and (c) (4) (d)

---

**100.** Which of the following are **not** true about Dilip Chitre ?

(a) He was educated at Baroda and Mumbai.

(b) He lived and taught only in Ethiopia.

(c) He is a post modern poet.

(d) His only book of English poems is ***Travelling in a Cage***.

(e) He writes in two languages : English and Hindi.

**Answer options :**

(1) (b), (c) and (e) (2) (a), (c) and (d) (3) (a), (b) and (c) (4) (a), (d) and (e)

---

-o0o-

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्र. क्र. 201. "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्यप्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल, यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. 201 समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. 201. ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा** /SPACE FOR ROUGH WORK

SEAL

www.reliableacademy.com 9222353999

# परीक्षेचे नाव : राज्य सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८

**विषय : प्रश्नपुस्तिका - २ मराठी व इंग्रजी** **परीक्षेचा दिनांक : १८ ऑगस्ट, २०१८**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत "**राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०१८**" या स्पर्धा परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपत्रिकेची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. त्यासंदर्भात उमेदवारांनी अधिप्रमाणित (Authentic) स्पष्टीकरण/संदर्भ देऊन पाठविलेली लेखी निवेदने, तसेच तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन आयोगाने उत्तरतालिका सुधारित केली आहे. या उत्तरतालिकेतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. यापुढे यासंदर्भात आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत. तसेच त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## उत्तरतालिका - KEY

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 1 | 2 | 3 | 4 | 2 |
| 2 | 2 | 3 | 2 | 1 |
| 3 | 4 | 4 | 3 | 2 |
| 4 | 4 | 2 | 3 | 4 |
| 5 | 4 | 3 | 3 | 3 |
| 6 | 2 | 4 | 4 | 2 |
| 7 | 3 | 3 | 3 | 2 |
| 8 | 3 | # | 3 | 4 |
| 9 | 1 | 1 | 2 | 4 |
| 10 | 3 | 4 | 4 | 4 |
| 11 | 2 | 1 | 2 | 3 |
| 12 | 4 | 3 | 3 | 2 |
| 13 | 3 | 1 | 1 | 4 |
| 14 | 3 | 2 | 4 | 3 |
| 15 | 3 | 3 | # | 3 |
| 16 | 4 | 3 | 2 | 1 |
| 17 | 2 | 2 | 3 | 3 |
| 18 | # | 2 | 4 | 3 |
| 19 | 4 | 2 | 1 | 1 |
| 20 | 2 | 2 | 2 | 4 |
| 21 | 1 | 3 | 3 | 3 |
| 22 | 3 | 2 | 2 | 3 |
| 23 | 4 | 3 | 4 | 4 |
| 24 | 1 | 2 | 3 | 1 |
| 25 | 3 | 3 | 2 | 2 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 26 | 4 | 4 | 4 | 1 |
| 27 | 3 | 3 | 3 | 4 |
| 28 | 2 | 2 | 3 | 2 |
| 29 | 2 | 4 | 1 | 3 |
| 30 | 3 | 1 | 2 | 3 |
| 31 | 1 | 4 | 4 | 4 |
| 32 | 3 | 3 | 3 | 3 |
| 33 | 4 | 2 | 3 | 2 |
| 34 | 2 | 4 | 1 | 2 |
| 35 | 1 | 3 | 2 | 3 |
| 36 | 1 | 3 | 3 | 3 |
| 37 | 3 | 1 | 3 | 3 |
| 38 | 2 | 3 | 2 | 2 |
| 39 | 3 | 4 | 1 | 3 |
| 40 | 2 | 1 | 4 | 4 |
| 41 | 4 | 3 | 3 | # |
| 42 | 3 | 2 | 2 | 1 |
| 43 | 3 | 4 | 4 | 2 |
| 44 | 3 | 4 | 3 | 3 |
| 45 | 3 | 3 | 1 | 3 |
| 46 | 2 | 4 | 3 | 3 |
| 47 | 4 | 3 | 2 | 2 |
| 48 | 3 | 1 | 2 | 2 |
| 49 | 1 | 2 | 1 | 4 |
| 50 | 2 | 2 | 4 | 1 |

**# दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत**



www.reliableacademy.com 9222339999

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 51 | 2 | 2 | 1 | 1 |
| 52 | 1 | 4 | 3 | 3 |
| 53 | 1 | 3 | 3 | 1 |
| 54 | 3 | 1 | 3 | 4 |
| 55 | 3 | 4 | 1 | 3 |
| 56 | 1 | 3 | 3 | 3 |
| 57 | 1 | 1 | 3 | 4 |
| 58 | 1 | 4 | 3 | 3 |
| 59 | 1 | 4 | 3 | 1 |
| 60 | 3 | 1 | 4 | 1 |
| 61 | 2 | 2 | 3 | 4 |
| 62 | 2 | 3 | 3 | 3 |
| 63 | 4 | 3 | 4 | 2 |
| 64 | 1 | 3 | 1 | 3 |
| 65 | 3 | 1 | 1 | 1 |
| 66 | 4 | 2 | 1 | 1 |
| 67 | 2 | 2 | 2 | 1 |
| 68 | 3 | 2 | 2 | 2 |
| 69 | 3 | 3 | 4 | 2 |
| 70 | 3 | 2 | 2 | 2 |
| 71 | 2 | 4 | 2 | 3 |
| 72 | 2 | 3 | 2 | 1 |
| 73 | 1 | 3 | 1 | 3 |
| 74 | 3 | 3 | 4 | 1 |
| 75 | 1 | 1 | 1 | 2 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 76 | 3 | 3 | 3 | 2 |
| 77 | 1 | 4 | 1 | 4 |
| 78 | 3 | 3 | 1 | 2 |
| 79 | 3 | 4 | 1 | 1 |
| 80 | 4 | 1 | 3 | 3 |
| 81 | 4 | 2 | 3 | 4 |
| 82 | 4 | 2 | 2 | 3 |
| 83 | 2 | 2 | 4 | 3 |
| 84 | 1 | 3 | 1 | 3 |
| 85 | 3 | 3 | 4 | 1 |
| 86 | 4 | 1 | 3 | 2 |
| 87 | 1 | 1 | 2 | 3 |
| 88 | 2 | 1 | 3 | 4 |
| 89 | 3 | 1 | 2 | 3 |
| 90 | 3 | 1 | 1 | 3 |
| 91 | 2 | 3 | 2 | 1 |
| 92 | 3 | 3 | 1 | 2 |
| 93 | 3 | 3 | 3 | 1 |
| 94 | 1 | 1 | 4 | 3 |
| 95 | 4 | 1 | 3 | 4 |
| 96 | 2 | 1 | 3 | 1 |
| 97 | 4 | 4 | 4 | 3 |
| 98 | 3 | 3 | 1 | 2 |
| 99 | 3 | 2 | 2 | 4 |
| 100 | 1 | 3 | 3 | 3 |

# दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत



www.reliableacademy.com 9922333999